## मन पाखरू-पाखरू

मन पाखरू-पाखरू,

आठवात लागे झुरू..

नव्या कहाणीचा आता,

नवा एक खेळ सुरु !!

मनी सपनाचा छंद,

राही तयातच बंद..

काळजाची धड-धड,

कधी तेज, कधी मंद !!

मन होई कासावीस,

नाही बघे रात, दिस...

कुणी अशी केली जादू -

कुणी लावलं गं पिसं ?

मनी देवाचाही धावा,

प्रेम हवे, नको कावा...

सर्वस्वाचे दिले देणे -

सांभाळ हो माझ्या नावा !!

**- प्रीती देशपांडे**
**http://www.meetipreeti.com**